**<u>गोपनीय</u>**

**क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१३७**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २० एप्रिल, २०१५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ मार्च, २०१५ (गुरुवार) रोजी झालेल्या १३७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

२०/४/१५
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३७व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२६ मार्च, २०१५ (गुरुवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ४.०० वाजता** |
| **सभास्थान** | **:** | **मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,<br>विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री. देवेंद्र फडणवीस<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. प्रकाश मेहता<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्रीमती स्नेहल आंबेकर<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री. प्रकाश बिनसाळे<br>विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| श्री. यशोधर फणसे<br>अध्यक्ष, स्थायी समिती व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिलीप पटेल<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव (अतिरिक्त कार्यभार),<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

..२/-

| | |
|---|---|
| श्री. सीताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

**निमंत्रित :**

श्री. नारायण मानकर
महापौर,
वसई-विरार शहर महानगरपालिका

श्री. संजय मोरे
महापौर,
ठाणे महानगरपालिका,

श्री. सुनील चौधरी
नगराध्यक्ष,
अंबरनाथ नगरपरिषद

श्रीमती चारुशीला घरत
नगराध्यक्षा,
पनवेल नगरपरिषद

श्रीमती मनिषा म्हैसकर
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अतिरिक्त कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

श्री. रामचंदानी
सह-व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
(व्यवस्थापकीय संचालक यांचे प्रतिनिधी)

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

त्यानंतर, प्राधिकरणाने बॅ. ए. आर. अंतुले, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ०२ डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर प्राधिकरणाने बॅ. ए. आर.अंतुले यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास **(जोडपत्र)** मंजूरी दिली.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी मा. श्री. प्रकाश मेहता, गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य व मा.डॉ.रणजित पाटील, नगर विकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्राधिकरणाचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच, महानगर आयुक्त यांनी श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे प्राधिकरणाचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून व श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग व प्रधान सचिव (विशेष प्रकल्प), (अति. कार्यभार) सामान्य प्रशासन विभाग यांचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. मनुकुमार श्रीवास्तव, माजी प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री.देबाशिष चक्रबर्ती, माजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून व श्री.श्रीकांत सिंह, माजी प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग व प्रधान सचिव (विशेष प्रकल्प), (अति. कार्यभार), सामान्य प्रशासन विभाग यांनी प्राधिकरणाचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेतील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३६व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ कार्यवृत्तावरील चर्चेच्या वेळी प्राधिकरणाचे सदस्य श्री. यशोधर फणसे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, बाब क्र.३ मधील परिच्छेद क्र.३.८ मध्ये केलेल्या सूचना हया मी केलेल्या आहेत परंतू, सदर सुचनांवर श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री. सुरेश टोकरे, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद यांची नावे नमूद करण्यात आलेली आहेत. तरी, सदर दोन्ही ठिकाणी माझी नावे दर्शविण्यात यावीत.

१.२ त्यावर महानगर आयुक्त यांनी सदर दुरुस्ती कार्यवृत्तात करण्याबाबत मान्यता देण्यात यावी अशी प्राधिकरणास विनंती केली. त्यानुसार, पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली :-

**सुधारणा :** परिच्छेद क्र. ३.८ मधील **"प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका"** व **"प्राधिकरणाचे निमंत्रित श्री. सुरेश टोकरे, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद"** याऐवजी दोन्ही ठिकाणी **"प्राधिकरणाचे सदस्य श्री. यशोधर फणसे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका"** असे वाचावे.

१.३ उपरोक्त दुरुस्तीसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ :** **दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३६व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवाही अहवालावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधानपरिषद सदस्य यांनी बाब क्र.४ बाबत असे नमूद केले की, मेट्रो सुधारीत मार्ग - २ : दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो प्रकल्पाचे काम वेळेवर करण्यात यावे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा वार्षिक कार्य कार्यक्रम.**

३.१ महानगर आयुक्त यांनी सन २०१५-१६ च्या वार्षिक कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच प्राधिकरण पुढील आर्थिक वर्षात एकूण ६१ महत्वपूर्ण योजना / प्रकल्प राबविण्यात येणार आहेत त्याची थोडक्यात माहिती सांगितली.

३.२ प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मिठी नदीच्या कामाकरीता रु.३२ कोटीची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये कोणत्या प्रकारची कामे करण्यात येणार आहेत याबाबत माहिती विचारली तसेच यात मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामाचा समावेश आहे का अशी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी सदर आर्थिक तरतुदीमध्ये नव्याने गाळ काढण्याचा समावेश नसून प्राधिकरणामार्फत यापूर्वी करण्यात आलेल्या कामांची उर्वरित देयके आणि नवीन सरंक्षक भिंतीच्या कामाचे देयक अदा करण्यासाठी केली असल्याचे सांगितले.

३.३ मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी महापालिका आयुक्त यांना मिठी नदीच्या विकासासाठी महानगरपालिकेव्दारे निधीची तरतूद केली काय अशी विचारणा केली. त्यावर श्री. सिताराम कुंटे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे सदर कामासाठी रु. १५० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

..५/-

३.४ प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी ओशिवरा येथील वसाहतीमध्ये पायाभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याचे व यामुळे नागरीकांना गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आणले. यावर महानगर आयुक्त यांनी आगामी वर्षातील ओशिवरा जिल्हा केद्रांसाठीची आर्थिक तरतूद ही पायाभूत सोई सुविधांचे कामांसाठी असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर ओशिवरा जिल्हा केंद्राचा विकास करण्याची प्राधिकरणाची काही योजना आहे का, अशी विचारणा केली. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी ओशिवरा जिल्हा केंद्राचा विकास कसा करता येईल याचा अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेता येईल असे सांगितले.

३.५ प्राधिकरणाचे सदस्य श्री. यशोधर फणसे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकरणामार्फत बांधकाम करण्यात आलेल्या सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्याचे आरंभस्थळी सिग्नल उभारण्यात आला असून त्याच ठिकाणी गतिरोधक देखील बांधण्यात आला आहे व यामुळे तेथे वाहतूक कोंडी व मोठया प्रमाणात अपघात होत असल्याचे व यामुळे गतिरोधक हटविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणले. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सिग्नलची तसेच गतिरोधकाची उभारणी हे ट्रॅफिक पोलिसांचे व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सबंधित विभागाचे निर्देशानुसार करण्यात आले आहे. त्यामुळे गतिरोधक हटविण्याची कार्यवाही देखील त्या कार्यालयामार्फत होणे योग्य राहील. यावर मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्राधिकरणास निर्देश दिले की, सांताक्रुझ चेंबूर जोड रस्त्याचे बांधकाम प्राधिकरणामार्फत करण्यात आले असल्याने, गतिरोधक हटविण्याची कार्यवाही देखील प्राधिकरणामार्फत करण्यात यावी.

३.६ प्राधिकरणाचे निमंत्रित श्री सुनिल चौधरी, नगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपरिषद यांनी असे सांगितले की, नगरपरिषदेमार्फत सुमारे रुपये ५० कोटी रक्कमेचे अंतर्गत रस्ते बांधण्याचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात आले आहेत त्यावर कार्यवाही व्हावी, तसेच त्यांनी अंबरनाथ येथील बांधलेले स्कायवॉक रस्त्याच्या पलीकडे शाळेपर्यंत वाढविण्यात यावे असे मत व्यक्त केले. महानगर आयुक्त यांनी सदर स्कायवॉक शाळेने जागा उपलब्ध करुन दिल्यास वाढविण्यात येईल असे सांगितले.

३.७ प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधानपरिषद सदस्य यांनी स्कायवॉकचे काम पुन्हा हाती घेणार आहात काय याची विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी स्कॉयवॉकची कामे बंद करण्यात आलेली असून नवीन कामे हाती घेण्यात येणार नाहीत असे सांगितले. मात्र काही ठिकाणी गरज पडल्यास आहे त्या स्कायवॉकला एखादा नवीन प्रवेश/पोचमार्ग (approach) देण्याचे काम हाती घेता येईल.

३.८ प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधानपरिषद सदस्य यांनी असे सुचविले की, प्रस्तावित रेवस-कारंजा पुलापासून अलिबाग पर्यंत रस्ता फार अरुंद असून तो ४ + ४ मार्गिकांचा रस्ता केला पाहिजे. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग करणार असल्यामुळे प्राधिकरणाने हाती घेतला नाही. यावर प्राधिकरणाच्या सदस्या श्रीमती स्नेहल आंबेकर, मुंबईच्या महापौर यांनी असे सुचविले की, जर कामे सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत असतील तर ती कामे त्यांनीच करावीत.

३.९ चर्चेच्यावेळी, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, कोणतीही योजना आखताना त्यांचा कालावधी निश्चित करावा आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

३.१० चर्चेनंतर, प्राधिकरणाने सादर केलेल्या वार्षिक कार्यक्रमांना मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३३३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** (अ) प्राधिकरणाचा बाब टिप्पणीसह सादर केलेला २०१५-२०१६ सालचा वार्षिक कार्यक्रम व २०१५-२०१६ सालचा मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे. (ब) बाब टिप्पणीतील वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक.**

४.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प सादर केला. प्राधिकरणाचे सन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे वार्षिक अंदाजपत्रकाविषयी थोडक्यात माहिती दिली.

४.२ सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.५२८२.४५ कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने जमिन विक्रीपोटी रु.१८३१.११ कोटी, ठेवीवरील व्याज रु.१३६८.०० कोटी, महानगरपालिका / नगरपालिकांकडून कर्ज परतफेड व त्यावरील व्याज रु.३४१.०० कोटी, एमयुटीपी-२ साठी केंद्रीय अंशदान रु.३५०.०० कोटी, सहार उन्नत मार्गासाठी केंद्रीय अंशदान रु.१६.०० कोटी, विकास आकार रु.३८४.५४ कोटी, संकीर्ण जमा (निविदा प्रपत्राची विक्री व जमिन भाडेपट्टी आकारावरील व्याज)

..७/-

रु.६००.०० कोटी व इतर जमा रु.३९१.८० कोटी यांचा समावेश आहे. सन २०१४-२०१५ चे अर्थसंकल्प सादर करताना एकूण रु.३७३५.८९ कोटी इतकी रक्कम जमा होईल असे अपेक्षित होते. माहे डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत प्राप्त झालेल्या रक्कमांचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात जमा रक्कमा रु.५१८६.९८ कोटींची तरतूद केली आहे.

४.३ सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.३८३२.३० कोटी इतकी रक्कम खर्च होईल असे अपेक्षित आहे. यावर्षी प्रामुख्याने सार्वजनिक वाहतूक आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांना अधिक प्राधान्य देण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने मोनोरेलसाठी रु.४०२.६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रादेशिक जलस्त्रोताच्या विकासाकरीता रु. ८७.९० कोटी, मेट्रोसाठी सुमारे रु. २४३.०० कोटी, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प रु.१००५.०० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यावर रु.९१९.९७ कोटी, वडाळा ट्रक टर्मिनलकरीता रु.६५.५१ कोटी, वांद्रे-कुर्ला संकुलात नागरी सुविधा यावर अनुक्रमे रु.६५.४५ कोटी, मुंबई महानगर क्षेत्रात निवासस्थाने बांधणे रु.६०.०० कोटी, विकास केंद्रे रु.५०.०० कोटी, मुंबई महानगर प्रदेशात बाहय रस्ते सुधारणा रु.६९.९५ कोटी व इतर संकीर्ण प्रकल्पावर रु.२१०.०६ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. सर्वेक्षण व अभ्यासासाठी रु.१२.३० कोटी, अनुदाने रु.२१.३८ कोटी, स्थानिक संस्थांना कर्जे / मेगासिटी कर्जाची परतफेड रु.४५८.२० कोटी, प्रशासकीय खर्च व डेड स्टॉक याकरीता रु.१५३.९८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१४-१५ चे अर्थसंकल्प तयार करताना प्रकल्प तसेच विविध लेखाशिर्षापोटी रु.४२४०.७८ कोटी खर्च होतील असे अपेक्षित होते. माहे डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत झालेल्या खर्चाचा विचार करता सुधारीत अर्थसंकल्पात एकूण खर्चापोटी रु.२६८९.९० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. प्राधिकरणाचा सन २०१५-१६ मधील उत्पन्न रु.५२८२.४५ कोटी व खर्च रु.३८३२.३० कोटीचा विचार करता या वर्षामध्ये रु.१४५०.१५ कोटींचे अधिक्य दिसून येत आहे.

४.४ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीसह प्रस्तावित केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करुन मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १३३४:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम २३ (१)अन्वये प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २०१५-१६ सालचा अर्थसंकल्प आणि २०१४-२०१५ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याव्दारे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी आणि महानगर योजना - फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे सन २०१५-२०१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये व बाब टिप्पणीत नमूद केलेल्या परिवहन प्रकल्पांवरील सर्वेक्षणे, अभ्यास व अर्थसंकल्पीय तरतूदीप्रमाणे आवश्यक ती रक्कम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) यांच्याकडे हस्तांतरीत करण्यास प्राधिकरण याव्दारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नुकतेच सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता (SCLR) व पूर्व मुक्तमार्ग (Eastern Freeway) या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता व पुर्व मुक्तमार्ग या दोन्ही रस्त्यांवरील वाहतुक पूर्व द्रुतगती महामार्गास घाटकोपर (पूर्व) येथील छेडा नगर जंक्शन येथे मिळून त्यानंतर ठाणे व नवी मुंबई दिशेकडे वेगळी होते. त्यामुळे छेडा नगर जंक्शन येथे वाहतुकीची मोठया प्रमाणावर कोंडी होत आहे. तसेच अस्तिवातील छेडा नगर उड्डाणपुलावरुन सांताक्रुझ चेंबुर जोडरस्त्याकडे जाणारी वाहने आणि मानखुर्द / नवी मुंबई कडून येऊन महामार्गाकडे वळणारी वाहने यांची छेडा नगर उड्डाणपुलाचा शेवट व अमर महल उड्डाणपुलाची सुरुवात यातील सुमारे १०० मीटरच्या भागात सरमिसळ होत असल्याने येथे अपघातप्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी दुर करण्यासाठीच्या उपाय योजनांचा अभ्यास करण्यासाठी प्राधिकरणातर्फे मे. टेक्नोजेम कंन्सल्टंटस या सल्लागार संस्थेची नेमणुक करण्यात आली. सल्लागारांनी या ठिकाणी केलेल्या अभ्यासावरुन निदर्शनास आले की, सायन-ठाणे, सायन-मानखुर्द आणि मानखुर्द-ठाणे या दिशांकडे वाहतुकीचे प्रमाण सर्वाधिक असून या दिशांसाठी अतिरीक्त मार्गिका निर्माण करणे आवश्यक आहे.

५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सल्लागारांनी संपूर्ण अभ्यास करुन छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी विविध पर्याय सुचविले. या पर्यायांपैकी सर्वात उपयुक्त

पर्याय निवडण्यासाठी प्राधिकरणातर्फे अतिरीक्त महानगर आयुक्त (१), मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांची तज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती :-

| | |
|---|---|
| १. मुख्य अभियंता-१, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | - सदस्य |
| २. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | - सदस्य |
| ३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई | - सदस्य |
| ४. मुख्य अभियंता (रस्ते), बृहन्मुंबई महानगरपालिका | - सदस्य |
| ५. अतिरीक्त पोलिस आयुक्त (वाहतुक) | - सदस्य |
| ६. मुख्य अभियंता-२, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | - सदस्य सचिव |

तज्ञ समितीने सल्लागारांनी सादर केलेल्या सर्व पर्यायांचा अभ्यास करुन यातील पुढील कामांचा समावेश असलेल्या पर्यायांची सर्वानुमते शिफारस केली :-

१. सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी अतिरीक्त उड्डाणपुल बांधणे.
२. मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर उड्डाणपुल बांधणे.
३. अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र उन्नत मार्गिका बांधणे,
४. सायन -मानखुर्द दिशेकडील वाहतुकीसाठी भुयारी मार्ग बांधणे,
५. गरोडीया नगर येथील अस्तित्वातील भुयारी मार्ग महामार्गावर ठाणे दिशेकडे स्थलांतरीत करणे.

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वरील प्रस्तावित कामांपैकी सायन-मानखुर्द दिशेकडील वाहतुकीसाठी भुयारी मार्ग बांधणे, या कामाच्या मार्गामध्ये विविध सेवावाहिन्यांचा अडथळा येत असल्याने सदर भुयारी मार्ग बांधणे अतिशय अवघड आहे. तसेच अ.क्र. १, २ व ३ ही कामे केल्यानंतर अमर महल येथून मानखुर्द व नवी मुंबई येथे जाणा-या वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे. वरील कामे केल्याने सध्या छेडा नगर जंक्शन येथील वाहतुकीतील सुमारे ६०% मुख्य दिशांकडील वाहतुक विना अडथळा पार होणार आहे व यामुळे उर्वरित दिशांकडील वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे. वरील बाबी लक्षात घेऊन सद्यःस्थितीत छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक सुधारणा प्रकल्पांतर्गत पुढील कामे प्रस्तावित करण्यात आली :-

१. सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी तीन मार्गिकांचा अतिरीक्त उड्डाणपुल बांधणे- या पुलाची लांबी ६८० मीटर असून रुंदी १२ मीटर असेल.

२. मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर दोन मार्गिकांचा उड्डाणपुल बांधणे- या पुलाची लांबी १२४० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.

३. अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र दोन मार्गिकांची उन्नत मार्गिका बांधणे - या उन्नतमार्गिकेची लांबी ६५० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.

५.५ महानगर आयुक्त यांनी या प्रकल्पाचा अंदाजपत्रकीय खर्च पुढीलप्रमाणे सादर केला :-

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी उड्डाणपुल बांधणे | रु. ५७.६६ कोटी |
| २. | मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर उड्डाणपुल बांधणे | रु. ९४.३९ कोटी |
| ३. | अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र उन्नत मार्गिका बांधणे | रु. ५२.२८ कोटी |
| | **प्रकल्पाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च(१+२+३)** | **रु. २०४.३३ कोटी** |
| ४. | सल्लागार मानधन (@ २%) | रु. ४.०९ कोटी |
| ५. | भाववाढ (@ १०%) | रु. २०.४३ कोटी |
| ६. | आकस्मिक खर्च (@ ५%) | रु. १०.२२ कोटी |
| ७. | सेवावाहिन्या हलविणे (@ ५%) | रु. १०.२२ कोटी |
| | **एकूण प्रकल्पाचा अंदाजित खर्च** | **रु. २४९.२९ कोटी** |

५.६ महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पुर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीत शिफारसी करिता सादर करण्यात आला होता. कार्यकारी समितीने सदर प्रस्ताव ठराव क्र.१२६८ अन्वये मंजूर करुन प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस केली.

५.७ प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश मेहता, गृहनिर्माण मंत्री यांनी पूर्व द्रुतगती महामार्गावर प्रस्तावित छेडा नगर उड्डाणपूलानंतर परिसरातील स्थानिक वाहनांना रस्ता ओलांडण्यासाठी भूयारी मार्ग बांधण्याची सूचना केली. यावर महानगर आयुक्त यांनी सदर सूचनेबाबत मा. मंत्री महोदयांशी चर्चा करुन त्यावर विचार करण्यात येईल असे सांगितले.

५.८ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पुर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबतच्या रु. २४९.२९ कोटी रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्यात आल्याचे सांगितले.

५.९ त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३३५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पुर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबतच्या रु. २४९.२९ कोटी रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **शिळफाटा कल्याण व मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपुलांच्या बांधकामाकरीता वाढीव किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या सुमारे रु.१११३.३५ कोटी अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधकामाच्या कामास दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १२९व्या बैठकीत ठराव क्र. १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामांमध्ये मुंब्रा जंक्शन तसेच शिळफाटा कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूलांच्या बांधकामांचा समावेश आहे. वरील दोन्ही ठिकाणच्या प्रस्तावित उड्डाणपूलांच्या कामाकरीता भौगोलिक सर्वेक्षण, वाहतूकीचा अभ्यास करणे, वाहनांचे उगम-गंतव्यचे सर्वेक्षण करणे, संकल्पचित्र तयार करणे व अंदाजपत्रके बनविणे इ. कामांसाठी मे.स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात आले. दिनांक ०८ सप्टेबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९व्या बैठकीमध्ये मंजूर केल्याप्रमाणे मुंब्रा जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाची अंदाजित किंमत रु. ५३.२१ कोटी होती. तसेच शिळफाटा जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाची अंदाजित किंमत रु.९७.२३ कोटी होती. प्रकल्प सल्लागाराने केलेल्या वाहतूकीच्या सर्वेक्षणानुसार मुंब्रा जंक्शन येथे सकाळी दर ताशी अधिकतम ५६४२ तसेच

..१२/-

शिळफाटा जंक्शन येथे संध्याकाळी अधिकतम ६९९३ इतक्या PCU ची नोंद करण्यात आली. यामुळे प्रशासकीय मान्यतेत मंजूर असलेल्या २ + २ मार्गिकांऐवजी ३ + ३ मार्गिकांच्या उड्डाणपूलांचे बांधकाम करणे अनिवार्य आहे. तसेच मुंब्रा जंक्शन येथे ऐरोली-कटाई हा नविन प्रस्तावित मार्ग येऊन मिळत असल्यामुळे मुंब्रा जंक्शन येथील उड्डाणपूलाची लांबी वाढविणे क्रमप्राप्त ठरले. सुधारीत आराखडयाप्रमाणे आता वरील दोन्ही उड्डाणपूल बांधकाम प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्याचे विश्लेषण महानगर आयुक्तांनी पुढीलप्रमाणे विषद केले :-

१. **मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूल :-**

अ) प्रशासकीय मान्यतेप्रमाणे अंदाजित किंमत रु.५३.२१ कोटी

ब) प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रु.१०७ कोटी

**किंमतीत वाढ झालेल्या बाबी :**

अ) प्रशासकीय मान्यता घेतांना १७.२ मीटर रुंदीचा २ + २ मार्गिकांचा उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित होते. उड्डाणपुलाची मूळ अंदाजित किंमत रु.२३.२५ कोटी ही जिल्हा दर सूची सन २०११-१२ वर आधारीत होती. उड्डाणपूलांच्या सुधारीत आराखडयात २४.२ मीटर रुंदीचा ३ + ३ मार्गिकांचा उड्डाणपूल बांधणे प्रस्तावित असून यामुळे अतिरिक्त १ + १ मार्गिकांची वाढ झाल्यामुळे (रु.८.३३ कोटी) तसेच प्रचलित जिल्हा दर सूची सन २०१३-१४ च्या दरांतील फरकामुळे (रु.२.९२ कोटी) किंमतीत एकूण रु. ११.२५ कोटीची वाढ झाली आहे.

ब) प्रस्तावित ऐरोली-कटाई नाका रस्त्याचे विकिरण (Dispersal) मुंब्रा उड्डाणपूलाखाली होत असल्यामुळे उड्डाणपूलाच्या लांबीत ३०० मीटर ऐवजी ५४० मीटर वाढ झाली. ही वाढ २४० मीटर इतकी आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. २१.५१ कोटीची वाढ झाली आहे.

क) सुधारीत आराखडयानुसार रॅम्पच्या लांबीत २८० मीटर ऐवजी ३८५ मीटर वाढ झाल्याने किंमतीत रु. ४.१९ कोटींची वाढ झाली आहे.

ड) मूळ प्रस्तावातील उड्डाणपूलाखालील रस्ते (Slip Road), गटारे व नाले यामध्ये थोडा बदल केल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु.२.०३ कोटी रक्कमेची बचत झाली आहे.

इ) मूळ प्रस्तावात मुंब्रा बायपास येथील भुयारी पादचारी मार्गाच्या विस्तारीकरणाचा समावेश नव्हता. सदर विस्तारीकरणाचे काम आवश्यक असल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. ३.८३ कोटीची वाढ झाली आहे.

ई) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ अंदाजे ३०.०० मीटर रुंदीचा असून त्याचा मालकी हक्क रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्रालय यांचेकडे आहे. तळोजा कडील जकात नाक्यापासून मुंब्रा पर्यंतचा भाग रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्रालयाने ठाणे महानगरपालिकेस ९९ वर्षाच्या भाडेपट्टयावर दिलेला आहे. ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात सदर रस्ता ६० मीटर रुंदीचा असून त्यामध्ये दोन्ही बाजूस ७.५ मीटर रुंदीच्या सेवा रस्त्यांचा अंतर्भाव आहे. उड्डाणपूलाच्या बांधकामासोबत सेवा रस्त्याच्या बांधकामाचासुध्दा अंतर्भाव करावा असे ठाणे महानगरपालिकेने सुचविले आहे. सेवा रस्त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत सुमारे रु. ६.०० कोटीची वाढ होत आहे.

उ) प्रकल्पाचा भौतिक आकस्मिक खर्च, भविष्यातील दरवाढ व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्क हे प्रकल्पाच्या किंमतीवर आधारीत असल्यामुळे प्रकल्पाच्या टक्केवारी खर्चात (Centage Charges) रक्कम रु. ८.९९ कोटीची वाढ होत आहे.

**एकूण निव्वळ वाढ :- रु. ५३.७४ कोटी**

२. **शिळफाटा-कल्याण जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूल :**

अ) प्रशासकीय मान्यतेप्रमाणे अंदाजित किंमत रु. ९७.२३ कोटी

ब) प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रु. २८६ कोटी

**किंमतीत वाढ झालेल्या बाबी :**

अ) प्रशासकीय मान्यता घेतांना शिळफाटा जंक्शन व कल्याण जंक्शन येथे दोन स्वतंत्र उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित होते. या दोन्ही स्वतंत्र २ + २ मार्गिकांच्या (१७.२ मीटर रुंद) उड्डाणपूलांची एकत्रित लांबी ६४० मीटर इतकी होती. दोन स्वतंत्र उड्डाणपूल २ + २ मार्गिकांऐवजी ३ + ३ मार्गिकांचे बांधण्यासाठी रु. ५२.२२ कोटीच्या अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. १९.९१ कोटीची वाढ होत आहे.

ब) वाहतूकीच्या सर्वेक्षणानुसार महापे व मुंब्राकडून डोंबिवलीच्या दिशेने ये-जा करणा-या वाहनांची संख्यासुध्दा लक्षणीय असल्याचे आढळून आले. वरील दोन्ही स्वतंत्र उड्डाणपूलांमध्ये फक्त ६० मीटर एवढेच अंतर असल्याने उड्डाणपूलावरील जडवाहतूकीस अडथळा टाळण्यासाठी दोन स्वतंत्र पूलाऐवजी एक सलग उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. महापे डोंबिवली ये-जा जडवाहतूकीस उड्डाणपूलाखाली जास्त जागा उपलब्ध व्हावी यासाठी प्रस्तावित उड्डाणपूलाच्या

खांबांची उंची दोन्ही जंक्शनच्या दरम्यान किमान ५.५ मीटर इतकी ठेवण्याचे प्रस्तावित आहे. उड्डाणपूलाची वाढलेली ९३० मीटर लांबी तसेच किमान ५.५ मीटर खांबांच्या उंचीमुळे अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु.८०.२३ कोटीची वाढ झाली आहे.

क) प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता घेताना मूळ अंदाजित किंमत जिल्हा दर सूची सन २०११-१२ वर आधारीत होती. सुधारीत अंदाजित किंमत जिल्हा दर सूची सन २०१३-१४ वर आधारीत असून दरांतील फरकामुळे उड्डाणपूलाच्या एकूण किंमतीच्या रु. ६१.१४ कोटी मध्ये रु.१०.१२ कोटीची वाढ होत आहे.

ड) सुधारीत आराखडयातील प्रस्तावानुसार उड्डाणपूलाखाली होणा-या जड वाहतूकीकरीता कॉंक्रीटचे रस्ते बांधणे, आर.सी.सी.ची गटारे बांधणे इ. कामांकरीता सुमारे रु. २३.६५ कोटीची वाढ होत आहे.

इ) ठाणे महानगरपालिकेने सुचविल्याप्रमाणे सेवारस्त्यांच्या बांधकामाकरीता सुमारे रु.१६.०० कोटीची वाढ अपेक्षित आहे.

ई) उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण महामंडळाच्या अति उच्च दाबाच्या एकूण ४ वाहिन्या नविन मनोरा बांधून उंच करणे आवश्यक आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या जलवाहिन्यासुध्दा स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत सुमारे रु.११.०० कोटीची वाढ झाली आहे.

उ) प्रकल्पाचा भौतिक आकस्मिक खर्च, भविष्यातील दरवाढ व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्क हे प्रकल्पाच्या किंमतीवर आधारीत असल्यामुळे प्रकल्पाच्या टक्केवारी खर्चात (Centage Charges) रक्कम रु.२७.७७ कोटीची वाढ होणार आहे.

**एकूण निव्वळ वाढ :- रु. १८८.६८ कोटी.**

**३. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या शुल्कात होणारी वाढ :**

या प्रकल्पासाठी मे. स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. यांची संकल्पचित्र पडताळणी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९ व्या बैठकीत ठराव क्र.१२३४ नुसार नियुक्ती केली. त्यांना प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु. १५०.०० कोटी वर १.८% अधिक सेवा कर या दराने रक्कम रु.२.७० कोटी शुल्कावर नियुक्त करण्यात आले आहे. वर उल्लेखिलेल्या विविध कारणांमुळे मुंब्रा जंक्शन व शिळफाटा कल्याण जंक्शन येथील उड्डाणपूलांच्या

आराखडयात बदल झाल्याने व पर्यायाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कर्तव्ये, जबाबदा-या तसेच प्रकल्पासाठी लागणारे मुख्य व्यावसायिक कर्मचारी यांच्या संख्येत होणारी वृध्दी यांची त्या प्रमाणात वाढ होत असून त्यांचे शुल्क सुधारीत किंमतीवर अदा करणे आवश्यक आहे. याकरीता व प्रकल्पाच्या एकूणच वाढलेल्या किंमतीच्या अनुषंगाने सल्लागाराच्या शुल्काबाबत सल्लागाराशी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी दरम्यान सल्लागाराने कामाच्या वाढलेल्या व्याप्तीच्या अनुषंगाने विनंती प्रस्तावातील मान्य केलेल्या ११.५ ऐवजी १६ मनुष्यबळ दरमहा पुरविण्याचे मान्य केले. याकरिता प्रकल्प सल्लागाराने १.६६% अधिक सेवाकर इतके सुधारीत शुल्कात काम करण्याची तयारी दर्शवली आहे. या टक्केवारीने सुधारीत प्रशासकीय किंमतीवरील एकूण शुल्क रक्कम रु. ५.१५ कोटी इतके येत आहे.

६.२ वरील दोन्ही उड्डाणपूलांखालील रस्ते (Slip Road) व सेवा रस्त्यांच्या बांधकामाकरीता सुमारे ११४ पक्की घरे व ७२ कच्च्या झोपडया अतिक्रमीत असून त्या पाडून सदर जागा ठाणे महानगरपालिकेने रस्त्याच्या बांधकामाकरीता प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावयाची आहे. याकरीता ठाणे महानगरपालिका व प्राधिकरण यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. ठाणे महानगरपालिकेकडे अतिक्रमणे काढण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे. वरील अंदाजित रक्कमेमध्ये पुर्नवसनाकरीता व जमीन संपादनाकरीता लागणा-या रक्कमेचा समावेश नाही.

६.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>**ठराव क्र. १३३६ :**</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणाऱ्या मुंब्रा जंक्शन व शिळफाटा-कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूल बांधणे या प्रकल्पांच्या अंदाजित खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूल व त्या अनुषंगाने करावयाच्या इतर बाबींच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु. १०७ कोटीच्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
२. शिळफाटा-कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूल व अनुषंगाने करावयाच्या इतर बाबींच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु.२८६ कोटीच्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र. १:** **विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा (Extd. MUIP) प्रकल्पांतर्गत वसई - भाईंदर खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२०व्या बैठकीत नायगाव-भाईंदर दरम्यान वसई खाडीवर २.० कि.मी. लांबीच्या दुपदरी पूलाच्या बांधकामास रु.१०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पात पश्चिमेकडील बाजूस रेल्वे लाईनला समांतर जुन्या सद्य:स्थितीत बंद असलेल्या पूलाची दुरुस्ती करुन वाहतूकीसाठी योग्य करण्याच्या कामाचा अंतर्भाव होता. सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांचे मार्फत करण्याचे ठरविले होते. त्यांनी रेल्वे समांतर जूना पूल दुरुस्ती करण्याचे योग्य नसल्याचे सांगितले. तसेच सदर प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या धर्तीवर बांधणे शक्य नसल्याचेही त्यांनी कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावित खाडीपूलाचे नव्याने सर्वेक्षण करुन नविन सरळ रेषेत पूल बांधणे व भविष्यातील वाहतूकीचा विचार करुन पूलाच्या मार्गिकांची संख्या ठरविणे इ. कामाकरीता मे. स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे असे सांगितले.

तद्नंतर, प्राधिकरणाच्या सदस्यांना सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. तसेच या पूलाकरीता तीन पर्यायी मार्गांचा अभ्यास करण्यात आल्याचे सांगितले. त्यापैकी पर्याय क्र.२ हा भूसंपादन, तिवरांची तोड, पूलाची लांबी व किंमत इ. बाबींमध्ये कमी असल्यामुळे तसेच बाधित झोपडया नसल्यामुळे निश्चित करण्यात आला असे सांगितले. तसेच या पूलामुळे भविष्यात पश्चिमेकडील बाजूस जोडमार्ग तयार होवून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ला पर्यायी मार्ग तयार होईल.

प्राधिकरणाचे सदस्य व मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. स्वाधीन क्षत्रिय यांनी पांजू बेटाकरीता पोहोच मार्गाची व्यवस्था केली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी पांजू बेटाकरीता पोहोच मार्ग बांधण्याची तरतूद करण्यात आली असून याचा उपयोग स्थानिक रहिवाश्यांना ये-जा करण्याकरीता तसेच पोलीस वाहनांना सुरक्षेच्या दृष्टीने गस्त घालण्याकरीता सुकर होईल असे सांगितले.

..१७/-

प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधानपरिषद सदस्य यांनी विचारणा केली की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी सुचविलेल्या तीन पर्यायांपैकी कोणता पर्याय निश्चित करण्यात आला? यावर महानगर आयुक्त यांनी पर्याय क्र. २ हा भूसंपादन, तिवरांची तोड, पूलांची लांबी व किंमत इत्यादी बाबींमध्ये कमी असल्यामुळे निश्चित करण्यात आला असे सांगितले.

प्राधिकरणाचे निमंत्रित श्री.नारायण मानकर, महापौर, वसई - विरार शहर महानगरपालिका यांनी प्राधिकरणाने वसई-भाईंदर खाडीपूलाचा प्रकल्प हाती घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले व पुढे असेही सांगितले की, सदर पूल हा भविष्यात वसई- भाईंदर- मुंबई वाहतूकीस ये-जा करण्याऱ्यासाठी सुकर होईल.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३३७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम २१ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे प्रस्तावित केल्याप्रमाणे विस्तारीत पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिमेकडील वसई-भाईंदरला जोडणाऱ्या खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता नव्याने एकूण प्रशासकीय मान्यता रु. ८७५.५४ कोटी एवढया रक्कमेस कार्यकारी समितीच्या सूचना विचारात घेवून व शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्द्रारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----------XOX-----------

**जोडपत्र**

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १३७ वी बैठक

**दिनांक : २६ मार्च, २०१५**

### : ठराव :

"बॅ. ए. आर. अंतुले, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ०२ डिसेंबर, २०१४ रोजी निधन झाले. बॅ. अंतुले हे दिनांक ०१ मार्च, १९७५ ते १० फेब्रुवारी, १९७६ या कालावधीत गृहनिर्माण मंत्री या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात बॅ. अंतुले यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत बॅ. अंतुले यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********